**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

दिनांक २२/०३/२०२५ (शनिवार) दुपार

---

## सोशल मिडीयवर धार्मीक भावना दुखावतील अशी पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन काटोल :— **नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस हे सतत सोशल मिडीया मॅनीटरींग करत असुन सोशल मिडीयावर बारकाईने लक्ष ठेवुन आहे. त्यामुळे कोणीही कोणत्या धर्माला ,जातीला अनुसरून धार्मीक भावना दुखावतील तसेच जातीय तेढ निर्माण होईल असे फोटो, व्हिडीओ, मजकुर सोशल मिडीयावर पोस्ट करत असेल तसेच स्टोरी किंवा स्टेटस ठेवत असेल तर त्याच्या वर तात्काळ कायदेशिर कारवाई केली जात आहे**. आज दिनांक २२/०३/२०२५ रोजी आरोपी नामे दिव्यंम सुरेशसिंग बैस, वय २३ वर्षे, रा. सावळी पर्बत, काटोल, नागपुर याने त्याच्या इन्स्टाग्राम आयडी वरून औरंगजेब बाबत धार्मीक भावना दुखावतील तसेच जातीया तेढ निर्माण होईल अशी स्टोरी/स्टेटस ठेवल्याने पोलीस स्टेशन काटोल येथे नमुद आरोपीविरूध्द कलम २९९,१९६,३५३ (२),६१(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद आहे. नमुद आरोपीकडुन त्याचा मोबाईल जप्त करण्यात आला असुन पुढील तपासणी साठी न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा येथे पाठविण्यात येणार आहे तसेच नमुद आरोपीविरूध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे.